दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • रविवार दि.२६ ऑक्टोबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ६६ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Sunday 26 Oct 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 66 • Pages 4 • Rate 4 Rs

### जुन्या कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील

# घरची मुर्गी दाल बराबर म्हणत नितीन गडकरींनी टोचले भाजप नेत्यांचे कान



दैनिक वादळ वार्ता
**नागपूर (वृत्तसंस्था)**

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर येथे झालेल्या एका कार्यक्रमात केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी या इनकमिंगच्या राजकारणावर भाष्य करत पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा थेट इशारा दिला आहे. पक्षात नवीन लोक येत असतील, तर ते स्वागतार्ह आहे; पण त्याचबरोबर जुन्या कार्यकर्त्यांच्या निष्ठेचा आणि कष्टांचा आदर ठेवला पाहिजे, असं म्हणत गडकरींनी पक्षातील काही नेत्यांना सूचक संदेश दिला.राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असल्याने सर्वच राजकीय पक्षांमध्ये हालचालींना वेग आला आहे. भाजपमध्ये नव्या नेत्यांच्या प्रवेशाचा ओघ वाढत असताना, पक्षातील वरिष्ठ नेते गडकरी यांनी यावर रोखठोक प्रतिक्रिया दिली आहे.

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर येथे विकासकामांच्या भूमिपूजन कार्यक्रमात बोलताना गडकरी म्हणाले की, भाजपमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात नवीन लोकांचा ओघ आहे. हे चांगलं आहे, पण ज्यांनी पक्ष उभा केला, कठीण काळात काम केलं, त्यांना विसरून चालणार नाही. यावेळी मंचावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. गडकरी यांनी त्यांच्याकडे पाहत म्हटले की, बावनकुळे, जुन्या कार्यकर्त्यांकडे लक्ष द्या. तेच आपल्या पक्षाचं खरं बळ आहेत. निष्ठावंत कार्यकर्ते जर नाराज झाले, तर पक्ष कितीही मोठा झाला तरी एका दिवसात खाली येऊ शकतो. त्यांच्या या वक्तव्याने उपस्थितांमध्ये एकच कुजबुज सुरू झाली.

या कार्यक्रमात गडकरी यांनी आपली खास नागपुरी शैली वापरत कार्यकर्त्यांना समजावलं. घरची मुर्गी दाल बराबर आणि बाहेरचं सावजी चिकन मसाला असं काहीतरी झालंय, असं म्हणत त्यांनी पक्षातील वातावरणाचं अचूक वर्णन केलं. त्यांनी डॉ. राजीव पोतदार यांचा उल्लेख करत सांगितलं की, तो प्रामाणिक, निष्ठावंत आणि जनतेशी जोडलेला कार्यकर्ता आहे. त्याने आपलं वैद्यकीय काम बाजूला ठेवलं आणि लोकांसाठी रात्रंदिवस फिरत राहिला. अशा लोकांकडे दुर्लक्ष करणं म्हणजे पक्षाचं नुकसान करणे. गडकरींनी बावनकुळे यांना थेट उद्देशून म्हटले की, डॉ. पोतदारसारख्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिलं नाही, तर पुढे अडचणी निर्माण होतील.केंद्रीय मंत्र्यांच्या या वक्तव्याला राजकीय वर्तुळात मोठं महत्त्व दिलं जात आहे. भाजपमध्ये अलीकडे विविध पक्षांमधून आलेल्या नेत्यांना मोठ्या जबाबदाऱ्या देण्यात येत आहेत, तर जुन्या कार्यकर्त्यांना मागे सारलं जात असल्याची नाराजी तळागाळात आहे. अशा पार्श्वभूमीवर गडकरींचं हे भाषण म्हणजे नाराज कार्यकर्त्यांना दिलासा आणि पक्षातील उच्चस्तरावर एक इशारा असा दुहेरी अर्थ घेतला जातोय. त्यांच्या या विधानाने भाजपच्या अंतर्गत गटबाजीवरही पुन्हा प्रकाश टाकला आहे.शेवटी गडकरींनी स्पष्टपणे सांगितलं की, राजकारणात निष्ठा, काम आणि जनतेशी असलेला संवाद हाच खरा पाया आहे. निवडणुका फक्त पैसा आणि प्रतिष्ठेच्या जोरावर जिंकल्या जात नाहीत. जुने कार्यकर्ते हेच पक्षाचं बळ आहेत. त्यांना विसरू नका, नाहीतर जेवढ्या वेगाने वर चढाल, तेवढ्याच वेगाने खालीही याल. त्यांच्या या थेट आणि स्पष्ट शब्दांनी भाजपमधील अनेक नेत्यांचे कान टोचले गेले आहेत. गडकरींच्या वक्तव्यामुळे पक्षाच्या धोरणांवर आणि आगामी निवडणुकांतील उमेदवारीच्या समीकरणांवर नक्कीच परिणाम होणार असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

## केज तालुका काँग्रेसच्या अल्पसंख्याक अध्यक्षपदी ॲड.अजमेर शेख

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



तालुक्यातील होळ येथील ड.अजमेर सादेक शेख यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या केज तालुका अल्पसंख्याक अध्यक्षपदी शनिवारी (दि.२५) निवड करण्यात आली आहे. ही निवड भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या तथा खा.रजनीताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी माजी मंत्री अशोकराव पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस आदित्य पाटील, बीड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष राहुल सोनवणे, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष असिफोद्दीन खतीब यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण शेप, केज तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रवीण खोडसे, विश्वजीत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, ड.अजमेर शेख यांचे उच्चशिक्षण दिल्ली येथे झालेले असून कायद्याचे शिक्षणही घेतलेले आहे. होळ येथे त्यांनी गेल्या १० वर्षांपासून स्वतःचे मोफत ग्रंथालय व कोचिंग क्लासेस चालविले आहेत. तसेच, सातत्याने समाजमाध्यमातून अल्पसंख्याकांच्या प्रश्नावर आवाज उठवत असतात. आता त्यांनी राजकारणात सक्रीय होण्याचा निर्णय घेतला असून काँग्रेस पक्षातून राजकीय कार्याला सुरुवात केली आहे. मान्यवरांनी ड.अजमेर शेख यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## आहेर चिंचोली येथील ८५ शेतकऱ्यांना नामच्या मोफत बियाण्यांचे वाटप

### ॲड.अजित देशमुख यांच्या हस्ते वाटप

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**



आहेर चिंचोली या गावाला पुराच्या पाण्याने मोठा तडाखा बसला होता. बंधाऱ्या लगत आणि नदी किनारी असलेल्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तसेच नदीचे पात्र देखील बदलले होते. या गावातील ८५ शेतकऱ्यांना नाम फाउंडेशन माध्यमातून आलेले मोफत बियाण्याचे वाटप स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड.अजित एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये पुराच्या पाण्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. नाम फाउंडेशनच्या वतीने पात्र शेतकऱ्यांची निवड करून त्यांना मोफत बियाण्याचे वाटप करण्याचे नियोजन ठरवण्यात आले होते. नाम फाउंडेशनने बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना मोफत बियाणे देण्याचे उद्दिष्ट ठरवले होते. हरभरा आणि ज्वारी या बियाण्यांचे वाटप करण्यात आले. चिंचोली गावचे रहिवासी ॲड.महादेव तुपे,ॲड.उमेश रकटे, तसेच ॲड.बाळासाहेब गायकवाड, दिनकर सुरवसे पाटील यांनी विशेष सहकार्य केले. तसेच गणेश रकटे, संतराम चव्हाण, काशिनाथ सुरवसे, सुभाष काळे, कर्ण बहिर, भारत बहिर, रामनाथ सुरवसे, जनार्धन रकटे या आणि इतर शेतकऱ्यांना याचा लाभ देण्यात आला. शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना नाम फाउंडेशनचे आभार मानले.

## नैसर्गिक संकटात बळीराजाला दिलासा श्रीक्षेत्र पावनधाम संस्थानचा पुढाकार ५१ शेतकऱ्यांना मोफत हरभरा बियाण्यांचे वाटप

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



नैसर्गिक संकटात श्री क्षेत्र पावनधाम संस्थान ने बळी राजाला दिलासा दिला असून धारुर तालुक्यातील ५१ शेतकरी बांधवांना हरभरा बियाणे वाटप करुन दिलासा दिला आहे.याबाबतीत सविस्तर माहिती अशी की,शेतकऱ्यांवर यंदाच्या अतिवृष्टीचे प्रचंड संकट कोसळले असून,शेतीचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले आहे.पिकांचे नुकसान,मातीची धूप आणि आर्थिकअडचणींनी त्रस्त झालेल्या अल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी श्री जगद्गुरू तुकोबाराय पावन धाम संस्थान,औरंगपुर ता.केज,जि.बीड यांच्या वतीने मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे. या सामाजिक बांधिलकी च्या उपक्रमा अंतर्गत ५१ शेतकऱ्यांना मोफत हरभरा बियाण्यांचे वाटप करण्यात आले.प्रत्येक शेतकऱ्याला प्रति एकर २० किलो बियाणे देण्यात आले.हा उपक्रम दिनांक २४ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता धारुर येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला. या उपक्रमाचे आयोजन महंत ह.भ.प.श्री.महादेव महाराज बोराडे शास्त्री (श्री जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम संस्थान)यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.या वेळी विविध सामाजिक,औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमासाठी सुभद्रा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज,पुणे, तसेच नामदेव इंदरराव गोरे,संजय गोपाळराव देशपांडे,एम.एस.दत्ता, सुधीर कोसलगे,ज्ञानेश्वर हिवरेकर,जालिंदर भाऊ कुटे आणि दिनेश शेठ सुराणा यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला प्राचार्य गोपाळ काकडे,प्रकाश करपे,वैभव कोटूळे, बाळासाहेब खामकर, कुंभार सर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.अतिवृष्टी मुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतीला पुन्हा उभारी देण्यासाठी करण्यात आलेला हा उपक्रम ग्रामीण भागात आशेचा किरण ठरला आहे. या मदतीमुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लकेर उमटली असून, समाजातील संस्थात्मक सहकार्याचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. बळीराजा हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणाआहे. त्याच्या अडचणीच्या काळात समाजाने त्याच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी सेवा आहे, असे मत महंत ह.भ.प.श्री.महादेव महाराज बोराडे यांनी व्यक्त केले.हा उपक्रम केवळ बियाण्यांचे वाटप न राहता बळीराजाच्या आत्मविश्वासाला दिलेला नवसंजीवनीचा हात ठरला आहे.यावेळी लाभार्थी बळीराजाने कृतज्ञता व्यक्त केली आहे.

## डॉ.संपदा मुंडे प्रकरणात दोषींवर कठोर कार्यवाही करा,या मागणीसाठी केज येथे रास्ता रोको संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



फलटण येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.संपदा मुंडे ची आत्महत्या ही नीति मूल्ये हरवलेल्या प्रशासकीय व्यवस्थेचे प्रदर्शन असून सामान्य कुटुंबातील या उच्च शिक्षित डॉक्टर तरुणीची आत्महत्या समाजाला चिंतेत टाकणारी व भयभीत करणारी आहे. डॉ.संपदाच्या आत्महत्येस कारणीभूत असणाऱ्या पोलिस अधिकारी, राजकीय लोकप्रतिनिधी व इतर संबंधितावर गुन्हे दाखल करून कठोर कार्यवाही करा या मागणी साठी शनिवारी सकाळी केज येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात केज विकास संघर्ष समिती,शेकाप व इतर सामाजिक संघटनांच्या वतीने रस्ता करण्यात आला.डॉ.संपदा मुंडे या फलटण येथे उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होत्या.याठिकाणी त्यांना आरोपीच्या फिटनेस प्रमाणपत्रावरून पोलिस अधिकारी,खासदार लोकप्रतिनिधी व इतर लोकांकडून प्रचंड दबाव टाकला जात होता. यासाठी त्यांचा लैंगिक, मानसिक व शारीरिक छळ केला जातअसल्याचे त्यांनी नमूद केलेल्या तक्रारीत म्हटले आहे. यावरून सध्या सर्वच क्षेत्रात सेवा करणाऱ्या महिलांच्या समस्या आल्या आहेत.सध्या वैद्यकीय डॉक्टर बनून बहुतांश तरुण तरुणी मोठ्या शहरात मोठी हॉस्पिटल उभी करून सेवा देतात. मात्र डॉ. संपदा मुंडे ही सामान्य कुटुंबातील मुलगी होती. एमबीबीएस सारख्या क्षेत्रात उच्च शिक्षण घेऊन ही ती फलटण सारख्या ग्रामीण भागात वैद्यकीय अधिकारी म्हणून गरीब जनतेची सेवा करत होती. ती श्रीमंतांची लेक असती तर तिने पुढील शिक्षण घेऊन मोठे हॉस्पिटल टाकले असते.ती महाराष्ट्रा तील सामान्य व गरीब कुटुंबाची प्रतिनिधी होती. डॉ.संपदा मुंडेने वरिष्ठांना आपल्याला होत असलेल्या त्रासाबद्दल कळवले होते.त्याचवेळी तिच्या तक्रारीची दखल घेतली असती तर कदाचित तिचा जीव वाचला असता.ही घटना अत्यंत गंभीर व तितकीच अस्वस्थ व चिंतेत टाकणारी आहे.या घटने तील सर्व दोषी लोकांवर चौकशी करून कार्यवाही करावी व दोषींना कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी यावेळी आंदोलकांच्या वतीने सामाजिककार्यकर्ते हनुमंत भोसले,भाई मोहन गुंड,महेश जाजू,नासेर मुंडे व इतर नागरिकांच्या वतीने करण्यात आले. केज पोलिसांनी आंदोलन कर्त्याच्या वतीने निवेदन स्वीकारले.

## पावनधाम येथे राष्ट्रवादीचे नेते रमेशरावजी आडसकर यांची भेट

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

सन २०२५ च्या कार्तिक वारी दिंडी सोहळ्याबद्दल, 'पावनधाम ते पंढरपूर' या दिंडीतील भाविक भक्तासाठी दि.२५ ऑक्टोबर २०२५ रोजी अन्नदान राष्ट्रवादी कांग्रेसचे युवक केज तालुकाध्यक्ष शिवदास थळकरी यांनी दिंडीतील भाविक भक्तासाठी अन्नदान ठेवले होते.कार्तिक वारी दिंडी सोहळ्याबद्दल पावनधाम येथे अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते रमेशरावजी आडसकर यांनी भेट दिली तसेच श्री.ह.भ.प.महादेव महाराज बोराडे यांचा सत्कार केला.यावेळी उपस्थित राष्ट्रवादी कांग्रेसचे युवक केज तालुकाध्यक्ष शिवदास थळकरी,किरण सातपुते भाविक भक्त उपस्थित होते.



संपादकीय

# जे रम्य ते बघूनिया...



'जेथे रहावयाचे तेथे सौंदर्य निर्माण करावयाचे' हा मानवाचा धर्म आहे. मन, बुद्धी, वाचा आणि देहाच्या विविध शक्ती यांचा उपयोग सौंदर्यपोषणासाठी करणे म्हणजे सौंदर्याभिरुची. सुंदर वस्तू शोधणे, निर्माण करणे, सांभाळणे, जोपासणे, वाढविणे, टिकविणे, कुठल्याही सौंदर्याला कधीही धक्का लागणार नाही, याची काळजी वहाणे या आणि अशा वृत्ती जेथे असतील, तेथे सौंदर्याभिरुची आहे असे समजावे. तेथेच जीवन सुख आहे, पर्यायाने आनंद आहे.

अनेक पशुपक्षी अतिशय सुंदर दिसतात, पण ती त्यांना निसर्गाची पर्यायाने, देवाची देणगी आहे. त्यासाठी ते स्वतः जाणीवपूर्वक प्रयत्न करीत नाहीत. घराच्या मागच्या झाडांवर चपळ खारीचे धावणे मी नेहमीच बघतो. धावता धावता ती थबकते, वळून पाहते, गोंडेदार शेपूट हलवते व बघता बघता दुसऱ्या फांदीवर निघून जाते. ते सर्व काही सुंदर असते. राणीच्या बागेत हरणांचे डोळे तर सशांचे पांढरे-शुभ्र मऊ मखमली अंग, मोराचा पिसारा, वाघाचे पट्टेदार धिप्पाड शरीर, हत्तीचे पांढरे शुभ्र दात, लांब सोंड आणि डौलदार चाल या सर्व गोष्टी सुंदर असतात. पण कोणासाठी? मनुष्यासाठी. कारण आपल्या ठिकाणी सौंदर्यभावना असते, तोच जीवन आनंद आहे. आरडाओरड करण्यासाठी शक्ती लागत नाही, तर शांत राहण्यासाठीच अधिक शक्ती लागते. आणि यास जर अध्यात्माची जोड असेल, तर संयम राखणे सोपे जाते. संयमी मन ही दुर्बलतेची निशाणी नसून आत्मिक शक्तीचा साक्षात्कार असतो. शांत राहणे हा पराभव नसून प्रगल्भतेची ताकद असते, कसोटी असते.

गुरुजींच्या संगमेश्वरच्या मठात दर पावसाळ्याच्या सुरुवातीस काही संन्याशी रहावयास येतात. नुकताच पावसाळा सुरू झाला होता; आणि एक संन्याशी, मठाकडे येताना दोन्ही बाजूला काहीतरी फेकीत येत होता. परत झोळीत हात घालून तेच करीत होता. त्यांना विचारले, 'महाराज आपण हे काय करत आहात?' ते म्हणाले या फुलझाडांच्या बिया आहेत. आणि पाऊस पडल्यावर रोपे उगवतील व लवकरच त्यांच्यावर मोठमोठी रंगबिरंगी फुले येतील. अहाहा! दोन्ही बाजूंनी फुलेच फुले! मग हा रस्ता किती बरे रमणीय वाटेल? ते संन्याशी पुढे म्हणाले, 'मी हेच काम करीत करीत, इतर पडेल ती कामे करतो. मात्र, दिवाळीचा पाडवा झाल्यावर अन्यत्र जातो. हा माझा छंद आहे. येथे मी फळझाडांना, फुलझाडांना खत घालतो व मठ परिसर झाडझूड करून स्वच्छ ठेवतो. नंतर धार्मिक ग्रंथांचे पारायण करून भजन, पूजन, ध्यान करतो. म्हणून ठायी ठायी सौंदर्य निर्मिती करून त्या परमसुंदराची पूजा करतो व ते मोठ्या गुरुजींना खूप आवडते. यात आपले जीवन सफल होते. हा एक जीवन आनंदच आहे. तो मला अनुभूतीतून प्राप्त होतो.

प्रतिवर्षी हजारो रसिक काश्मीर, गोवा, वेरूळ, अजिंठा, कोणार्क, चारधाम इत्यादी ठिकाणी जातात. काही हिमालयाच्या पायथ्यावरून त्यांच्या सुवर्णकांती शिखराकडे टक लावून बघतात. तर काही समुद्रकिनारी जाऊन लाटांचे तांडव पाहतात. उगवत्या आणि मावळत्या सूर्यबिंबाची शोभा मी सूर्यमाळ, जव्हार, तसेच कन्याकुमारीला बघितली. स्वामी विवेकानंदांचे शिळास्मारक तर इतके रमणीय आहे की, तेथे गेल्यावरच त्याचे महत्त्व उमगू शकते. यासाठी आयुष्यभर पैसा पैसा न करता वेळ काढून तेथे जाणे आहे. पंढरपूरच्या वारीचा आनंद आणि परम पांडुरंगाचे दर्शन किती सुखकारक आहे, हे स्वानुभवातूनच दिसते. जीवन आनंद हा स्वतः मिळविण्याची गोष्ट आहे.

जे रम्य ते बघूनिया, मज वेड लागे
गाणे मनात मग होय, जीवन गाणे...

मानवी जीवन हे संघर्षमय असले तरी, खाली ओढणारे जडतत्व आणि वर उचलणारे नीतीतत्त्व यांच्या ओढाओढीतून माणसाला आधार देणारी आणि सांभाळणारी कलेच्या, अनुभूतीच्या आणि क्रीडेच्या रूपाने गवसलेली जी शक्ती, तीच सौंदर्य उपासना. मी जेथे कोठे जाईन तेथे सौंदर्यच फुलवीन अशी प्रत्येकाची जिद्द हवी. माझे बोलणे, चालणे, वागणे, उठणे, बसणे, विचार करणे सर्व काही सुंदर,पर्यायाने आनंदी हवे. मुख्य म्हणजे आपण आज आनंदी दिसण्यासाठी जितकी धडपड करतो, तितकीच किंबहुना त्यापेक्षा अधिक धडपड त्याने जीवन आनंदी करण्याकरिता केली पाहिजे. हीच जीवनाची सार्थकता.

# संगीताचे मेंदूविज्ञान

माणसाचे माणूसपण कशात? या सवालाचा जबाब देताना विज्ञान काही गुणविशेष सांगते, त्यातील एक महत्त्वाचा गुणविशेष म्हणजे 'संगीत'! पाखरे गातात, देवमासे, डॉल्फिन्स हे सुद्धा गुणगुणतात. उत्क्रांतीचा विचारपुरुष डार्विनने सांगितले आहे त्याचा आशय असा, 'नर वानर गणातील प्राणी 'मादी आणि नर' एकमेकाला आकर्षून घेण्याकरता समागमाच्या काळात सांगीतिक-स्वर आणि ताल वापरतात.' माणूस यापेक्षा खूप निराळा आहे तो 'कंठ संगीत' तसेच 'वाद्य संगीत' निर्मितो. प्राणी जगतात हे कोणी करताना दिसत नाही. मानवी संगीतात 'तानसेन' असतात, तसे 'कानसेनही' असतात. माणूस एकट्याने संगीत एन्जॉय करतो आणि समूहानेही जीवाचा कान करून ऐकतो. पाश्चात्य देशातील लाईव्ह कॉन्सर्ट्समध्ये लाखांची तरुणाई उभे राहून बेभान होऊन ऐकत असते. तत्त्वज्ञ निश्ते म्हणाला होता, 'आपण संगीत आपल्या स्नायूंनी ऐकतो.'प्रत्येक कलेची भाषा असते. मेंदूविज्ञानाने यावर संशोधनाने प्रकाश टाकला आहे. दृश्यकलेची भाषा चित्र आणि शिल्प, कथनकलेची भाषा शब्द, संगीताची भाषा स्वर, लय, ताल. संगीताचे मुख्य माध्यम ध्वनी, 'सॉनिक मीडियम'. यात दृष्टी संवेदनाचा भाग असतो, असे नूतन शोधात मेंदूविज्ञानाला आढळून आले आहे. माणूस सुखदु:खात, आनंदात, धार्मिक प्रसंगात आणि अगदी युद्धातसुद्धा संगीताचा उल्हासाने उपयोग करतो. कोणत्याही कलेत दोन घटक असतात. कला निर्माण करणारा 'निर्मिक' आणि कलेचा आस्वाद घेणारा 'आस्वादक'. संगीताचा या दोघांच्या मेंदूवर परिणाम होत असतो आणि पर्यायाने त्यांच्या वर्तनावर सुद्धा परिणाम होत असतो. या दोहोंचा मेंदूविज्ञानाने शोध-वेध घेऊन बोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.


वाणीचे केंद्र म्हणजे ध्वनी निर्माण करण्याचे केंद्र आणि त्या आवाजाचा अर्थ लावण्याचे केंद्र, मेंदूतील या दोन्ही केंद्रांचा शोध ब्रोका आणि वर्नीके या दोन मेंदूतज्ज्ञांनी दोन शतकांपूर्वी लावला होता. ही दोन्ही केंद्रे मेंदूच्या डाव्या गोलार्धात असतात, हे सुद्धा समजले होते. संगीतातील स्वर, ताल, लय, ध्वनीची गती हे अमूर्त ध्वनी असतात. त्याचे मेंदूत संवेदन कोठे होते, याचा शोध



आधुनिक संशोधनाने घेतला आहे.१९०५ सालची घटना. बॉन्वीसिनी या युरोपियन मेंदूतज्ज्ञाकडे मेंदूला इजा झालेला एक पेशंट आला होता. त्याला सगळ्या वाद्यांचे ध्वनी ओळखता येत होते, तो चुकीचे स्वरही ओळखत असे, पण त्याला राष्ट्रगीताचे शब्द कळत नसत. वाद्यांचे ध्वनी ओळखण्याची मेंदूतील प्रक्रिया आणि केंद्रे आणि शब्द ओळखण्याची प्रक्रिया भिन्न असल्या पाहिजेत, असे त्या मेंदूतज्ज्ञाने ताडले. मेंदूच्या विकृतीच्या शोधातून मेंदूसंशोधनाला योग्य दिशा मिळाली. असे मेंदूविज्ञानाच्या इतिहासात अनेकदा घडले आहे. आताही असेच घडले.तीन दशकांपूर्वी मेंदूसंशोधनाची विविध तंत्रे उपलब्ध झाली. त्याचा उपयोग करून मारसेलेस (चरींशळश्रश्रशी) आणि मॉंट्रीयल (ऐर्पीशरश्र) या दोन विद्यापीठांत संगीत संवेदनावर मेंदूसंशोधन झाले. वाणीचा ध्वनी ओळखण्याची मेंदूतील प्रक्रिया आणि संगीतसंवेदनावरची प्रक्रिया या विभिन्न असतात. वाणीचा आवाज डाव्या गोलार्धात ओळखला जातो, तर संगीतध्वनी ओळखण्यात दोन्ही गोलार्ध काम करतात, पण उजव्या गोलार्धाचे योगदान जास्त असते. याचा सखोल अर्थ समजून घेतला पाहिजे. संगीतध्वनी निर्माण करणारा उजवा गोलार्ध वापरतो आणि संगीत ऐकणारा सुद्धा संगीतध्वनीचा अर्थ लावताना उजवा गोलार्धही वापरतो. मेंदू हा चतुर अवयव आहे, तो कमीतकमी सामुग्री वापरून आणि कमी ऊर्जा वापरून काम करत असतो. या संशोधनात आणखी एक गोष्ट उघड झाली. ध्वनी स्वरमानात बदल झाला तेव्हा काही दृष्टिकेंद्रे उजळून निघाली, म्हणजे उद्दिपित झाली.संगीतामुळे वर सांगितलेली कॉर्टेक्समधील केंद्रे उद्दिपित होतात आणि तेथून निघणारे संदेश थेट 'लिम्बिक सिस्टिम' म्हणजे, भावनेच्या आदिम भागापर्यंत जातात आणि त्यांना उद्दिपित करतात. यासाठी अमेरिकेतील ओहायो विद्यापीठाने एक सर्वेक्षण केले तेव्हा ७० टक्के लोकांनी 'संगीतामुळे आमच्या भावना उद्दिपित होतात,' असे सांगितले. सुसंवादी आणि विसंवादी मेलडीमुळे भावनिक केंद्रातील वेगळे भाग उद्दिपित होतात, असे स्कॅनिंगमध्ये आढळून आले. त्यामुळे काही संगीतामुळे दु:खद, तर काहींमुळे सुखद भावना निर्माण होतात, याला मेंदूविज्ञानाने आधार दिला आहे. हासू आणि आंसू संगीत निर्माण करू शकते.माझा एक कानसेन मित्र आहे. तो संगीताच्या लाईव्ह-सचेतन कार्यक्रमाला नेहमी हजेरी लावतो. मला प्रश्न पडला होता, असे का? झुरिक आणि ओस्लो विद्यापीठाने त्याचे उत्तर दिले. एका खोलीत पियानो वादक वाजवत होता आणि ते ऐकणाऱ्या माणसाच्या मेंदूचे स्कॅनिंग केले. त्याच्या मेंदूतील ॲमिगडला हे महत्त्वाचे केंद्र आणि इतर भावनेची केंद्रे उजळून निघालेली दिसली. काही दिवसांनी तेच संगीत ध्वनिमुद्रित करून त्याला ऐकवले आणि स्कॅनिंग केले तर काय आश्चर्य, त्याच्या मेंदूतील भावनेची केंद्रे अगदी कमी प्रमाणात उद्दिपित झालेली दिसली. आता मला कारण कळले. श्रोते कसा प्रतिसाद देतात त्यानुसार गायकाचे, वादकाचे संगीत त्याला जुळवून घेते, हे सुद्धा मेंदूविज्ञानाने सिद्ध केले आहे.सेरिबेलम म्हणजे छोटा मेंदू हा संगीतासाठी आणि संगीतातील वाद्यवादनाकरिता अत्यंत महत्त्वाचा असतो. हा नसेल तर संगीत उभेच राहू शकत नाही. आपण पेटीवर फिरणारी बोटे, तबलजीचे हात पाहून चकित होतो. याला कारण छोटा मेंदू. मोटर कॉर्टेक्समुळे स्नायूंच्या हालचाली होतात, पण सरावामुळे त्या हालचाली उत्तम आणि सहज होण्यासाठी छोटा मेंदू लागतो. सरावामुळे छोटा मेंदू या हालचाली तुमच्याही नकळत सुधारतो. या हालचालींच्या स्मृती छोट्या मेंदूत साठवून ठेवल्या जातात. रियाज, सराव यामागे हे मेंदूविज्ञान आहे.कानाच्या आतल्या भागात ३५०० हेअर सेल्स असतात. या एक प्रकारच्या न्यूरॉन्स असतात. कानाच्या पडद्यावर आदळणाऱ्या ध्वनिलहरी या केशपेशी जणू झेलून घेतात आणि संदेश ऑडिटरी नर्व्हद्वारे मेंदूकडे पाठवतात. पुढे काय घडते, ते वर सांगितले आहे. या न्यूरॉन्स अतिशय नाजुक असतात. हाय डेसिबल्समुळे त्यांचे नुकसान होते. यामुळे उत्तम संगीत ऐकण्याची माणसाची क्षमता नाश पावते.माणसाचे कोणतेही वर्तन उगाच उत्क्रांत होत नाही. त्याला जीवनसंघर्षात तगून राहण्याचे मूल्य असते. नॅशनल जीऑग्राफिकने ६० हजार वर्षांपूर्वीची बासरी शोधून काढली आहे. गिधाडाच्या हाडापासून बनवलेली ही बासरी जगातील सर्वात प्राचीन वाद्य म्हणून ओळखली जाते. मन रिझवण्यासाठी, एकमेकांशी संपर्क साधण्याकरता, अशा विविध कारणांसाठी संगीत उत्क्रांत झाले असेल. संगीत या संस्कृत शब्दाच्या व्याख्येत नृत्य, गीत, वाद्यवादन या सगळ्यांचा समावेश होतो, याचे कारण उत्क्रांतीत दडले असावे.

# किमान उपायांची कमाल स्वप्ने

मुंबई महापालिकेने चालू आर्थिक वर्षासाठी 'वातावरणीय अर्थसंकल्प अहवाल' सादर करून पुढचे पाऊल टाकले आहे. असा अर्थसंकल्प मांडणारे मुंबई हे जगातील चौथे शहर असल्याचे सांगण्यात येत आहे. तसे असेल तर मुंबईसाठी ही गोष्ट अभिमानाची. महापालिकेने पर्यावरणानुकूल पावले टाकली तर शहरातील प्रदूषण तसेच कर्बोत्सर्जन कसे कमी होईल, हा या पर्यावरण अर्थसंकल्पाचा मुख्य उद्देश आहे. कार्बनप्रमाणेच अन्नकचरा तसेच इतरही काही कचऱ्यातून लक्षणीय प्रमाणात मिथेन या वायूचीही निर्मिती होते. या ज्वलनशील वायूचा उपयोग करणे, हेही पर्यावरण राखण्यासाठी आवश्यक आहे. एकूण उद्दिष्टे, त्यासाठीचा कृती कार्यक्रम आणि संभाव्य लक्ष्यपूर्ती अशी या सविस्तर अहवालाची मांडणी आहे. या ७० पानी अहवालात पाच विभाग आणि तीन परिशिष्टे आहेत. यात शहरी उष्णता, शहरात येणारे पूर, दरडी कोसळणे, सागर किनाऱ्यावरील धोके तसेच वायू प्रदूषण या पाच वातावरणीय जोखमींचा समावेश आहे. काय केल्यावर काय होऊ शकते, याचा अगदी दीर्घकालीन हिशेब यात मांडला आहे. म्हणजे उदाहरणार्थ सन २०५०पर्यंत रस्त्यांवरील वाहनांमधून होणारे कर्बोत्सर्जन शून्यावर आणणे. आणखी २५ वर्षांनी मुंबईत खनिज इंधनावर चालणारे एकही खासगी किंवा सार्वजनिक वाहन नसेल, हे स्वप्न चांगले वाटले तरी ते शक्य आहे का, याची संभाव्यताही पाहायला हवी. मुख्य म्हणजे, असे स्वप्न पाहणारा 'वातावरणीय अर्थसंकल्प' मांडला जात असेल; तर त्यासाठी आज आपण काय तयारी करत आहोत, याचाही लेखाजोखा मांडावा लागेल.



मुंबई महापालिकेकडून अपेक्षित असणारी किमान कामे आणि कर्तव्ये यांचे जोडकाम करून ती सगळी या अहवालात टाकून देण्यात आली आहेत. याचेही एक उदाहरण पाहण्यासारखे आहे. खरेतर शहरी पूर आणि जलसंपदेचे व्यवस्थापन हे कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचे मूलभूतच कर्तव्य असते. मग पर्यावरण आणि वातावरण यांना व्यापक धोका निर्माण झालेला असो किंवा नसो; पण यासाठी केलेली तरतूद वातावरणीय अर्थसंकल्पात दाखविण्यात आलेली आहे. मलनिस्सारण, कचरा व्यवस्थापन, जलशुद्धीकरण ही कामे महापालिकेने करायलाच हवीत. मुंबई महानगरी पर्यावरणाला अनुकूल आणि कर्बोत्सर्जन विरहीत करण्याचे काम त्याच्या नंतर चालू होते. मुंबई शहरातून समुद्रात जाणारे सर्व अशुद्ध पाणी शुद्ध कसे करता येईल तसेच किमान प्रदूषणकारी व धोकादायक बनवून मगच समुद्रात कसे सोडता येईल, याची कोणतीही व्यापक आणि सर्वंकष योजना मुंबई महापालिकेने इतक्या वर्षांमध्ये राबविलीच नव्हती, असा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीत केला होता. इतकी प्राथमिक गोष्ट जी महापालिका वर्षानुवर्षे करीत नाही, तिने आपण जगाला काहीतरी नवीनच करून दाखवितो आहोत, अशी शेखी मारण्यात काय अर्थ आहे? मुंबईतील पूरनियंत्रणाची तयारी किती आहे, हे समजायला आता फार दिवस राहिलेले नाहीत. मुंबईतील पर्जन्य जलवाहिन्या, मलनिस्सारण प्रकल्प तसेच वाहिन्या यांची अवस्था चांगली नाही. त्याचा फटका दरवर्षी बसत असतो. मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये गेले तर तेथील सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि त्यांची मलनिस्सारण व्यवस्थेशी असणारी जोडणी यांची अवस्था सहज दिसण्यासारखी आहे. यात मुंबईतील स्मशानांमध्ये होणाऱ्या लाकडी चितांवरील दहन संस्काराचा उल्लेख आहे. हे प्रमाण कमी झाले किंवा ते अधिक शास्त्रीय पद्धतीने झाले तर कार्बनचे प्रमाण कसे कमी होईल, तसेच लाकडांची म्हणजे वृक्षांची बचत कशी होईल, हे सांगण्यासाठी या अहवालात अनेक पाने खर्च करण्यात आली आहेत. पुढच्या उद्दिष्टांचे आकडे सांगून स्वत:ची पाठही थोपटून घेण्यात आली आहे. खरे तर मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत आजही कित्येक स्मशानभूमीत लाकडे रचावी लागतात आणि घनदाट वस्त्यांमध्ये दररोज कर्बोत्सर्जन होत राहते; याची शरम महापालिका प्रशासन तसेच निर्वाचित नगरसेवकांना वाटायला हवी होती. अनेक ठिकाणी नागरिकांनी पैसे जमवून डिझेल किंवा विद्युत दाहिन्या बसविल्या आहेत. महापालिकेने मनात आणले तर एका वर्षात मुंबईत एकही लाकडी चिता रचावी लागणार नाही, अशी उत्तम विद्युत दाहिन्यांची व्यवस्था करता येतील. पण मग वातावरणीय अर्थसंकल्पाची पाने कशी भरतील आणि नवीनच काही भव्यदिव्य केल्याचा टेंभा कसा मिरवता येईल? यातले 'बेस्ट'च्या बसगाड्या पारंपरिक इंधनाकडून विजेवर नेण्याचे काम फक्त व्यवस्थित चालू असलेले दिसते. मुंबईतला सेंद्रिय कचरा कमी करणे आणि नागरिकांना कचऱ्याच्या वर्गवारीची सक्ती करणे; यात महापालिकेला अपेक्षित यश आलेले नाही. मुंबईला रोज मिळणाऱ्या किती शुद्ध पाण्याचा फेरवापर होतो? त्याची सक्ती किती ठिकाणी आहे? मुंबईतील चार रुग्णालयांमधील ओल्या कचऱ्यातून वीज करण्याचा प्रकल्प आत्ताशी होतो आहे. तेव्हा, मुंबई महापालिकेने आपली नेहेमीची कामे प्रामाणिकपणे केली आणि दहा वर्षांपूर्वी ठरविलेली उद्दिष्टे जरी पुरी केली तरी पर्यावरण राखले जाईल. नवनवीन अहवालांचे पतंग उडविण्याची गरजही भासणार नाही.

# सैन्यरचनेतील परिवर्तन

सैन्यदलांत परिवर्तन होताना, असे करून त्यांची सामरिक क्षमता आणि संरक्षण सज्जता वाढेल का, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळायला हवे. अनेक वर्षांच्या विलंबानंतर तीनही सैन्यदलांचे एकत्रित कमांड स्थापन करण्याची योजना कार्यान्वित होणार आहे. योजनेची पार्श्वभूमी सर्वश्रुत आहे. कारगिल युद्धात भूदल आणि हवाई दलात आवश्यक तो समन्वय आणि सहकार्य नसल्याने अनेक उपाययोजना सुचविण्यात आल्या. त्यातील प्रमुख म्हणजे सैन्यदलांच्या सरसेनापतींचे पद (सीडीएस) आणि तीनही सैन्यदलांचे एकत्रित कमांड.अनेक वर्षांच्या चर्चांनंतर सन २०१९मध्ये सरकारने तत्कालीन लष्करप्रमुख जनरल बिपीन रावत यांना सीडीएसपदी नेमले व त्यांचे अधिकार ठरवताना संरक्षण खात्यात 'डिपार्टमेंट ऑफ मिलिटरी अफेअर्स' ही सचिवस्तरीय शाखा स्थापली. संरक्षण खात्याच्या प्रमुख सचिवांना सर्वाधिक अधिकार दिले. वास्तविक सीडीएस हेच सर्वांत ज्येष्ठ असायला पाहिजे होते; परंतु, जनरल रावत यांनी आक्षेप न घेता सर्व मान्य करत हे पद सांभाळले. सन २०२१मध्ये हेलिकॉप्टर दुर्घटनेत त्यांचे निधन झाले. नऊ महिन्यांच्या विलंबानंतर, निवृत्त झालेले लेफ्टनंट जनरल अनिल चौहान यांना सीडीएस करण्यात आले आणि त्यांना एकत्रित कमांड आणि अनुषंगाने मनुष्यबळ कमी करण्याची जबाबदारी दिली. एकत्रित कमांड योजना पहिल्यापासून वादग्रस्त ठरली. परंतु आता तीन प्रमुख एकत्रित भौगोलिक कमांड स्थापन होतील, असे समजते. एक कमांड मुख्यालय जयपूर येथे पश्चिमी सीमेसाठी, उत्तरी सीमेसाठी लखनौत आणि दक्षिणेत सागरी सीमाक्षेत्र सांभाळण्यासाठी कोईमतूर येथे कमांड स्थापन होण्याची शक्यता आहे. या निमित्ताने काही मुद्दे...तीनही सैन्यदलांत समन्वय व वाढत्या मनुष्यबळात घट, हे आवश्यक आहेच; परंतु ते कसे करावे हा कळीचा मुद्दा आहे. प्रत्येक सैन्यदलाची जबाबदारी, कार्यशैली, प्रशिक्षण हे आजवर ऐतिहासिक कारणांसाठी वेगळे आहेत व यामुळे एकच काम तिन्ही दलांत वेगवेगळे केले जाते. यामुळे, अवाजवी श्रम आणि अवाजवी खर्च होतो. तिन्ही सैन्यदलांचे क्षेत्रीय आणि कमांड मुख्यालये वेगवेगळ्या ठिकाणी स्थापित आहेत; त्यांना सहज एका जागी नेता येईल. अधिक महत्त्वाचे म्हणजे युद्धकाळात समन्वय आणि नियंत्रणाची जबाबदारी वाटताना कोणतीही उणीव नको. भू-सीमा आणि सागरी क्षेत्र हे लष्कर आणि नौदल सांभाळतात. प्रश्न येतो हवाई दलाचा. आपल्याकडे हवाई दलाच्या लढाऊ विमानांची कमतरता आहे. हवाई दलाच्या बळात लवचिकता असल्याने त्यांना फक्त एका क्षेत्रात बांधता येत नाही आणि वादाचा हा प्रमुख मुद्दा आहे. सर्व प्रश्न आत्तापर्यंत व्यवस्थापनाचे झाले; परंतु संरक्षण धोरणावर याचा कसा प्रभाव पडतो, हा खरा चर्चेचा मुद्दा हवा. सन १९४७पासून सीमा संरक्षणावर आपले धोरण आखलेले आहे आणि १९६२च्या पराभवानंतर आपण एक इंच जमीन गमावायला तयार नाही. घोषवाक्य म्हणून ठीक असले तरी लढाईत आक्रमक किंवा बचाव परिस्थितीत सीमा संरक्षण करताना शत्रूच्या सीमेत आक्रमण करण्याची क्षमता लागते आणि मुख्यतः चीनविरुद्ध कारवाई करण्याची तजवीज हवी. उदा. आत्तापर्यंत चीन सीमेवर आपण हवाई दल वापरलेले नाही. आता आघाडीवर लढाऊ आणि रसद पुरवणाऱ्या विमानांसाठी धावपट्टी कार्यरत केल्या आहेत. ही क्षमता योग्य संकेत पाठवत असली तरी प्रत्यक्षात त्यांचा सीमेपलीकडे वापर झालेला नाही. पाकिस्तानविरुद्ध अशी मर्यादा पाळलेली नाही; मग चीनबद्दल संकोच का असावा? नुकसान होईल म्हणून, की लढाईचे क्षेत्र वाढेल म्हणून, किंवा पराभव होण्याची शक्यता म्हणून, हे अनुत्तरित प्रश्न आहेत. आज भारत पूर्वीसारखा राहिला नाही. मग आपण उगीच थबकतो आणि मानसिक दबाव आणायला शत्रूलाच मदत करतो. अर्थात, हे सर्व योग्य विचार करून करावे लागेल. सन १९६७मध्ये सिक्कीमच्या नथुला खिंडीत आणि सन १९८७मध्ये अरुणाचल प्रदेशात तवांग क्षेत्रात सुमडोरोंग चू येथे आपण चीनला नमते घ्यायला भाग पाडले. आता परत असे करण्याची वेळ आली आहे. अट एवढीच, की कारवाई पूर्ण विचार आणि तयारीनंतर झाली पाहिजे. आधुनिक लढाईत, आधी हवाई दल, मग मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रे, नंतर तोफांचा भडिमार आणि अखेर भूदलाची आघाडी असा अनुक्रम हवा. शत्रूच्या हालचालींचे भाकीत कोणी करू शकत नाही. परंतु युद्धात आक्रमक पवित्रा घेतल्याशिवाय विजय अशक्य असतो. अशा स्थितीत एकत्रित कमांड उपयुक्त असतील आणि सर्व योजनेला अण्वस्त्रांचे कवच असेल तर पूर्ण युद्धाची रुपरेषा बदलेल. हाच एकत्रित कमांडचा मुख्य उद्देश हवा.सैन्यदलांचे आणि विशेषत: लष्कराचे मनुष्यबळ कमी झाल्याशिवाय संरक्षणखर्च घटणार नाही. ही घट करण्याच्या उपायांचे अनेक पैलू आहेत.

# युती होईल किंवा नाही होईल परंतु माजलगाव न.प.वर भगवा फडकवा

## अशोक पटवर्धन,बापूसाहेब मोरे, अनिल जगताप यांचे आवाहन

## माजलगावात शिवसेना पदाधिका-यांची बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव | दर्शन डोंगरे**

होउ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत माजलगाव नगरपरिषद निवडणुकीत युती होईल किंवा नाही होईल परंतु नगरपरिषदेवर उपमुख्यमंत्री पक्षप्रमुख एकनाथजी शिंदे यांचे नेतृत्वाखाली भगवा फडकविण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे असे आवाहन शिवसेनेचे मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, संपर्क प्रमुख बापुसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी केले आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संदर्भात शिवसेनेच्या वतीने दि. २५ ऑक्टोबर रोजी दु. २.०० वाजता हॉटेल व्यंकटेश येथे शिवसेना पदाधिका-यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणुन मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, संपर्क प्रमुख बापुसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, चंद्रकांत नवले, युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदा डोईजड, तालुकाप्रमुख तुकाराम



येवले, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना जिल्हाप्रमुख ह.भ.प. सर्जेराव महाराज काशिद, शहरप्रमुख पापा सोळंके उपस्थित होते. या बैठकीत दिंद्रुडचे ग्रामपंचायत सदस्य नारायण चांदबोधले, माजलगावचे युवा नेते जय सुतार, राजेश विघ्ने, सुरेश नवले यांनी आपल्या अनेक कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश घेतला तर या बैठकीमध्ये उपतालुकाप्रमुख म्हणुन महादेव सुरवसे, नारायण चांदबोधले, विधानसभा समन्वयक ॲड. महेश कुंभार, शहर संघटक म्हणुन अरविंद खंडागळे, तालुका संघटक म्हणुन राजेश विघ्ने, शहर उपप्रमुख जय सुतार ,बाबा यादव, बळीराम घोलप, सतिष देवकर, दत्ता कटारे, आदित्य टाकणखार, संदेश सोनवणे, अविनाश गायकवाड, शाम पासंगे, रितेश गायकवाड, सुयोग मोताळे, सोमेश्वर धारक, आकाश पाबळे, निशीकांत पाटील, पुरूषोत्तम आंबीलवादे, गोविंद शेडुते, रामभाउ हिंगण, अनिल गाडेकर, संतोष कदम, पवन उजगरे, बाबा यादव, रामेश्वर घाटुळ, अंगद खांडेकर, दिपक चोरघडे यांचेसह शहरातील विभागप्रमुख, उपविभागप्रमुख व ग्रामीण भागातील विभागप्रमुख, उपविभागप्रमुखांना नियुक्तीपत्र देउन निवडी करण्यात आल्या. या बैठकीला विजय मौजकर, युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, विनोद कुलथे, विकास झेटे, अनिल आवाड, रामेश्वर काशीद,अशोक डोणे, उदय नरवडे, किशोर झिंजुर्के राहुल बावणे,यांचेसह शिवसैनिक, युवासेना पदाधिकारी, महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुकाराम येवले यांनी केले. सुत्रसंचालन व आभार शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी मानले.

# चार शतकांची ऐतिहासिक परंपरा लाभलेले गायगोधन उत्साहात

दैनिक वादळ वार्ता

**भद्रावती | प्रतिनिधी**

तालुक्यातील घोट, निंबाळ, हेटी व चालबर्डी (रै.) येथील सीमेवर असलेल्या गायगोधनाच्या पटांगणावर आदिवासी गोंडगोवारी जमात तथा ग्रामीण विकास सेवा समिती घोटनिंबाळा, हेटी, चालबर्डी (रै.) द्वारे ऐतिहासिक गायगोधन पुजा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी परंपरेनुसार गाय गोधन व ढाल पूजनाचा उत्सव साजरा करण्यात आला. या परंपरेला ४०० वर्षांपेक्षाही अधिकचा प्रगल्भ इतिहास आहे.

प्राचीन काळापासून गायी राखणे हा गोंड गोवारी जमातीचा मुख्य व्यवसाय आहे. यामुळे चराईसाठी गाई रानात गेल्यावर त्यांचे रक्षण व्हावे, त्यांना कुठल्याही प्रकारची इजा होऊ नये म्हणून वाघोबा व नागोबा देवाची



पूजा करण्याची परंपरा आहे. या ऐतिहासिक गाय गोधन पूजेला विदर्भातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमाला आदिवासी गोंडगोवारी संस्कृती व कल्याण मंडळाचे सचिव विलास राऊत, भास्कर ताजणे, यशवंत वाघ, अशोक येरगुडे, देवेंद्र रामटेके, गणेश नागपुरे, कवडू नेहारे,संदिप नैताम, डॉ. अमोल ठाकरे, देवबाबा परसे, आशिष रामटेके, कैलास दुधकोहळे, लता दुधकोहळे, ज्योती मोरे, सुधाकर आत्राम, नरेंद्र जिवतोडे, महेश मोरे, केशव सोनवणे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अनिल नेहारे, रूपेश नेहारे, शुभम नागोसे, प्रकाश दुधकोहळे, किशोर नेहारे, दौलत दुधकोहळे, विपुल वाघाडे, गजानन आवारी, राजु दुधकोहळे, प्रल्हाद राऊत, वसंता नागोसे, प्रदिप राऊत, विठ्ठल नागोसे, प्रफुल नेहारे, संजय नगोसे, मनोहर राऊत यांनी परिश्रम घेतले.

# न्यू ईरा हायस्कूलच्या अनुष्का तेलगोटेची राष्ट्रीयस्तरावर निवड



दैनिक वादळ वार्ता

**अकोला | प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय त्वायकान्डो स्पर्धेमध्ये न्यू ईरा हायस्कूलच्या अनुष्का तेलगोटेने दणदणीत विजय मिळविला.

महाराष्ट्रातील संपूर्ण विभागातून विद्यार्थी स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये अमरावती विभागामधून प्रथम क्रमांक पटकावलेल्या न्यू ईरा हायस्कूल, अकोलाची विद्यार्थिनी अनुष्का तेलगोटे हिने अमरावती विभागाचे १७ वर्षाखालील ४२ ते ४४ किलोवजन गटामध्ये नेतृत्व करून राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक जिंकले. यामुळे तिची निवड पुढील महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील जम्मू-काश्मीर येथील स्पर्धे करीता झालेली आहे. प्रागतिक शिक्षक मंडळ अकोलाचे अध्यक्ष विश्वनाथजी गद्रे, उपाध्यक्ष जयंत मराठे, सचिव गिरीश गोखले, न्यू ईरा हायस्कूल अकोला चे मुख्याध्यापक महेश ठोके, योगिता मडावी, सुषमा देशमुख, अनंत कुलकर्णी, शुभम सरोदे तसेच सर्व शिक्षक वृंदांनी अनुष्का तेलगोटे आणि तिच्या आई वडिलांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. एका कार्यक्रमात उपस्थितांनी भावी यशासाठी पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या. तसेच दहावी वर्गामध्ये शिकणाऱ्या भूषण इंगळे, मोहन गोपनारायण, स्वरूप ढोणे यांनी सुद्धा विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन शाळेचे नाव उज्वल केले त्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

# आरएसएस ही रजिस्टर्ड संस्था नसताना सुद्धा पैसे गोळा करते:नाना पटोलेंची टीका

दैनिक वादळ वार्ता

**नागपूर (वृत्तसंस्था)**

आरएसएस ही रजिस्टर्ड संस्था नसताना सुद्धा पैसे गोळा करत आहे. गोळा केलेल्या पैशाचा हिशोब आरएसएसने जनतेला दिलाच पाहिजे. शासनाने यात लक्ष घातले पाहिजे, असे मत काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी व्यक्त केले आहे. आरएसएसला बंदी घालावी, या मागणीला घेऊन वंचित बहुजन आघाडी आणि आंबेडकर अनुयायी रस्त्यावर उतरले आहेत, यावर नाना पटोले यांनी आपले विचार मांडले आहेत.नाना पटोले म्हणाले, जेव्हा एखाद वेळी समूह एकत्र येतात. त्यामुळे ते पैसे गोळा होतात. ती संस्था काय करते? त्या संस्थेचा मूळ उद्देश काय आहे? या सगळ्या गोष्टी रजिस्ट्रेशनमध्ये असतात. यांचे कुठलेही रजिस्ट्रेशन झाले नसल्यामुळे हा प्रश्न सगळ्यांच्या समोर आहेच. काँग्रेसच्या सत्तेमध्ये सुद्धा त्या प्रकारचा अनेकदा प्रयत्न झाला. पण आता जनतेमध्ये त्या पद्धतीचा एक वातावरण मान होत असेल तर शासनाने त्यात लक्ष घातले पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात महिलांचा जो सन्मान होत होता. तो आता महायुतीच्या सरकारमध्ये होत नाही. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील महिला अत्याचाराच्या घटना समोर येत आहे. केंद्रात भाजपचे सरकार आहे. त्यांनीच नॅशनल क्राइम ब्युरोच्या सादर केलेल्या रिपोर्टमध्ये महाराष्ट्रात महिलांवर सर्वाधिक अत्याचार होत असल्याचे नमूद आहे. महाराष्ट्र आता महिलांसाठी असुरक्षित राज्य झाल्याची टीका नाना पटोले यांनी केली आहे.सातारा येथील डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्येच्या प्रकरणावर बोलताना नाना पटोले म्हणाले, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील महिला अत्याचाराच्या घटना समोर येतात आहेत. कर्मचारी असो की सामान्य महिला त्यांच्यावर सातत्याने अत्याचार होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. नॅशनल क्राइम ब्युरोचा जो आता रिपोर्ट आलेला आहे, त्यात महाराष्ट्र महिलांसाठी आता असुरक्षित आहे. महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण सर्वात जास्त असल्याची टीका पटोले यांनी केली आहे.



# दिवाळीनंतरही पाऊस महाराष्ट्रात ५ दिवस यलो अलर्ट

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

दिवाळी झाली तरी पाऊस महाराष्ट्रातून काढता पाय घेण्याचे नाव घेत नाही. आगामी पाच दिवस पुन्हा एकदा राज्यात जोरदार पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने आपल्या ताज्या अंदाजात वर्तवलीय. बहुतांश ठिकाणी यलो अलर्ट देण्यात आलाय. या काळात विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यताय.यंदा अतिवृष्टीने महाराष्ट्र बेजार झालाय. शेतकऱ्यांना चक्क काळी दिवाळी साजरी करावी लागली. हाता-तोंडाशी आलेले पीकच काय जमीन सुद्धा पावसाने खरवडून नेली. मात्र, आता पुन्हा पावसाचा अंदाज वर्तवल्याने चिंता व्यक्त होतेय.पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि नाशिक घाट, अहिल्यानगर, पुणे आणि पुणे घाट, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट, सांगली, सातारा, सातारा घाट, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. येथे विजांच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यताय.पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि नाशिक घाट, अहिल्यानगर, पुणे आणि पुणे घाट , सांगली, सातारा, सातारा घाट, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. येथे विजांच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यताय.पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि नाशिक घाट , अहिल्यानगर, पुणे आणि पुणे घाट, सोलापूर, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. येथे विजांच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यताय.

# नंदुरबार शहरात शिवशंभूंचा जयघोष! आ.रघुवंशींच्या हस्ते संभाजी महाराज पुतळ्याच्या जागेचे भूमिपूजन; आमदार निधीतून ३० लाखांचा विकास

## निवडणुकीनंतर पुतळ्याचे होणार लोकार्पण; बिरसा मुंडा व प्रभू रामाच्या मूर्तीचीही लवकरच शहरात उभारणी

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा जयघोष करीत, नंदुरबार शहर विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे. शिवसेनेचे संपर्कप्रमुख आमदार चंद्रकांत रघुवंशी आणि माजी नगराध्यक्षा रत्ना रघुवंशी यांच्या हस्ते दीपावली पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर शहरातील महत्त्वाकांक्षी संभाजी महाराज पुतळा जागेचे भूमिपूजन करण्यात आले. धुळे रस्त्यावरील श्री छत्रपती शिवाजी महाराज कॉलनीतील पालिकेच्या खुल्या जागेवर हा भव्य पुतळा उभा राहणार आहे.

यावेळी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी पुतळा परिसराच्या सुशोभीकरणासाठी त्यांच्या स्थानिक विकास निधीतून ३० लाख रुपये त्वरित उपलब्ध करून दिल्याची घोषणा केली. या निधीतून लहान मुलांसाठी खेळणी, ज्येष्ठ नागरिकांसाठी 'पार्थ वे' (फिरण्याची सोय), नागरिकांसाठी बाक आणि व्यायामासाठी साहित्य बसवण्यात येणार आहे. हा परिसर केवळ पुतळ्याची जागा नसून, नागरिकांसाठी एक अद्ययावत विरंगुळा केंद्र म्हणून विकसित केला जाईल.

संभाजी महाराजांचा हा पुतळा ब्रांझ धातूचा



असेल, आणि त्याचा संपूर्ण खर्च आमदार चंद्रकांत रघुवंशी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येणार आहे. पुतळा बसवण्यासाठी अंदाजे दीड महिन्याचा कालावधी लागणार असून,येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर या पुतळ्याचे दिमाखदार अनावरण करण्यात येईल, अशी माहिती आमदार रघुवंशी यांनी दिली.

केवळ संभाजी महाराजच नव्हे, तर शहराच्या संस्कृती आणि आस्थेशी जोडलेल्या अन्य दोन महत्त्वाच्या मूर्तीही लवकरच साकारण्यात येणार आहेत. भगवान बिरसा मुंडा यांचा पुतळा बसवण्यासाठी जागा निश्चित करण्याचे काम आदिवासी संघटनांशी चर्चा करून सुरू आहे. जागा निश्चित होताच निवडणुकीनंतर तोही उभा केला जाईल. तसेच, अयोध्येतील मंदिराप्रमाणेच प्रभू श्रीरामांची मूर्ती देखील शहरात साकारली जाईल. मूर्तीसाठी योग्य जागा सुचवण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले आहे.

या भूमिपूजन समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार शिरीष चौधरी होते. यावेळी उद्योगपती मनोज रघुवंशी, शिवसेना जिल्हाप्रमुख डव्होकेट राम रघुवंशी यांच्यासह पालिकेचे माजी पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुबलक अन्नधान्यासाठी कोणी माता आठीवटी पूजन

## परंपरा सातपुड्यातील आदिवासींमध्ये होतेय नवीन अन्नाचे पूजन

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

आदिवासी बांधव आज ही जपता आहे हजारो वर्षाची पुरातन अन्न पूजा विधी.धडगांव तालुक्यातील अस्तंबा ऋषीची यात्रा व दिवाळीच्या लक्ष्मी पूजना पासूनच सातपुड्यातील आदिवासी बांधवाची आठीवटी या अन्न धान्याच्या पारंपरिक पूजेला सुरुवात होते.दिवाळीच्या कालावधी आठीवटी पूजेला सुरुवात झाली असून.या पूजेनाला येथील भाषेत आठीवटी असे म्हटले जाते कोणीमातेची नवीन अन्न धान्याची पूजा पुजारी बाबा कडून घर मालकांच्या पालनीने विधिवत पद्धतीने मुबलक अन्नधान्य पुरावे म्हणून पूजा केली जाते. सातपुड्यातील डोंगर दऱ्यात राहणारा आदिवासी बांधव आपल्या शेतीतील पीक पेरणी पासून त्याची काढणी होऊन सेवन होई पर्यंत विविध पूजा या अन्नधान्यासाठी केल्या जातात त्यातील आठीवटी अत्यंत महत्त्वाची पूजा जी कोणी माते साठी केली जाते.ही पूजा प्रत्येक घरी केली जाते.नवाय व आठीवटी या दोन महत्त्वाच्या पूजा आहेत नवाय ही पूजा दसरा साजरी होण्यापूर्वी व आठीवटी नंतर केली जाते.नवाय म्हणजे शेतीतील नवीन भाजी व अन्नधान्याची सेवन करण्यापूर्वी करण्यात येणारी पूजा होय.धडगांव व मोलगी परिसरात याच पूजा विधींचा सूर सर्वत्र घुमत आहे.अस्तंबाच्या शिखरावरून उतरल्या नंतर आपापल्या सवडीनुसार हे बांधव आठीवती या पूजेसाठी कुटुंबात तयारी सुरू करतात गावातील सर्व मंडळीच्या सोयीनुसार ही पूजा विधी होते . ही पूजा रात्रीच्या वेळेस केली जात असून एका घरातील नवीन अन्नधान्य पूजेसाठी प्रथम घरातील प्रमुख व्यक्तीला पालनी करावी लागते ती पाच ते सात दिवसाची असते ही पूजा गावांतील प्रमुख पुजाऱ्या कडून करण्यात येते.आठीवटी पूजेत




प्रामुख्याने साळ (तांदूळ) मोठी (कणगी) ज्वारी,मोठी भेंडी रोषा हे सुगंधित गवत,जे अस्तंबा यात्रे वरून आणले जाते,मुसड,सूप,फुलहार (महूआ)ची दारू डोवी,बेलाची पाने,पळसाची पाने सुट्टे पैसे बोत नारळ,दिवा,या संसारिक जीवनातील सर्व उपयोगी वस्तूची पूजा घरातील आरोग्य धन संपत्ती पशुधन अन्नधान्य पुरेसे वर्षभर लाभोत या करिता ही पूजा करण्यात येते.

पूजेसाठी कुव्यातील,नदी तील नवीन शुद्ध पाणी सोबत ठेवून पूजेसाठी बसणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हात धुऊन हातात बेल पाने व डोवितील फुलहार घेऊन पाती घ्यावी लागते अशी पाच किव्हा सात जणांची पूजा झाल्यावर देव पूजा संपल्यावर देवाला व धरती मातेला वंदन केले जाते. देव पाहण्यासाठी आलेल्या सर्व व्यक्तींना प्रसाद म्हणून जेवण दिले जाते अशा पद्धतीने आठीवटी ही पारंपरिक पूजा संपन्न होते.आठीवटी पूजा ही मोलगी येथील ईरमा विटला वसावे यांच्या कडे संपन्न झाली ही पूजा मोलगी येथील रोता बाबा वळवी यांच्या कडून करण्यात आली.या पूजेसाठी गावांतील महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते रामसिंग वसावे,रतीलाल वसावे,दामा वसावे,कालुसिंग वसावे,आपसिंग वसावे,दौल्या वळवी,पाशा वसावे,दशरथ वसावे,सामा वसावे,हात्या वसावे, दाजला वसावे आदी उस्थित होते.

### डॉ.संपदा मुंडे यांना न्याय मिळण्यासाठी

# माजी आ.डॉ.नारायणराव मुंढे उपोषणाला बसणार

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**



सातारा जिल्ह्यातील फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉ.संपदा मुंडे यांनी आत्महत्या केलेली आहे. आत्महत्या केलेल्या महिला डॉक्टर ह्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कोठरबन येथील रहिवासी आहेत. या प्रकरणी माझ्यावर अन्याय होत आहे मी आत्महत्या करेल अशी वरिष्ठांकडे तक्रार पण केली होती परंतु वरिष्ठांनी त्याकडे दुर्लक्ष केले. पीडितेला न्याय मिळावा व सर्व आरोपींवर योग्य ती कारवाई करण्यासाठी व संपूर्ण प्रकरणाची एस.आय.टी.मार्फत चौकशी करून प्रकरणा तील दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हादाखल करावा या मागणीसाठी माजी आमदार डॉक्टर नारायणराव मुंढे हे जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे दिनांक २७-१०-२०२५ रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाला बसणार आहेत.

# करमाळा येथे बबनराव मेहर यांचा भव्य सेवा गौरव सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा सचिवांचे गटनेते, करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तसेच वरिष्ठ समाजसेवक बबनराव मेहर यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित भव्य सेवा गौरव सोहळा सोलापूर जिल्ह्यातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात पांडे गावचे सामाजिक कार्यकर्ते भागवत दुधे, भाजप किसान मोर्चाचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस अण्णासाहेब सुपनवर, सोलापूर जिल्हा ग्रंथालयाचे अध्यक्ष सुजित (तात्या) बागल, सामाजिक कार्यकर्ते अनिल तेली, पत्रकार अशोक नरसाळे, कृषीनिष्ठ पाक्षिकचे पुरस्कारप्राप्त संपादक विनायक रासकर, युवराज भोसले, पत्रकार दस्तगीर मुजावर, पत्रकार सुनील भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात मेहर यांच्या दीर्घकालीन सामाजिक व संस्थात्मक सेवेचा विशेष गौरव करण्यात आला. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेत त्यांनी तब्बल ३० ते ३५ वर्षे निस्वार्थ भावनेने सेवा बजावली. या काळात त्यांनी शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या उभं राहण्यासाठी मदत केली आणि त्यांच्या प्रश्नांसाठी नेहमीच आवाज उठवला.

बबनराव मेहर यांनी केवळ आर्थिक क्षेत्रातच नव्हे, तर सार्वजनिक जीवनातही मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांनी पांडे गावचे सरपंचपद भूषवले असून सध्या करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती म्हणून कार्यरत आहेत. गोरगरिब आणि वंचित समाजघटकांच्या कल्याणासाठी त्यांनी आयुष्य झोकून दिलं असून त्यांना गोरगरिबांचे कैवारी हणून ओळखले जाते.सेवा गौरव सोहळ्याच्या निमित्ताने मेहर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, उर्वरित आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण करणार असल्याचा दृढनिश्चय त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या निश्चयाचे उपस्थितांनी कौतुकपूर्वक स्वागत केले.कार्यक्रमाच्या शेवटी सौहार्दपूर्ण वातावरणात उपस्थितांनी एकमेकांशी संवाद साधला आणि बबनराव मेहर यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# केज येथील भगवान श्रीकृष्णआश्रम येथे आनंदी दीपावली महोत्सवात दिव्यांग बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

## प्रेरणादायी प्रबोधन व आध्यात्मिक प्रवचनाने उत्साहात साजरा झाला दीपावली उत्सव

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरात सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी उपक्रमांचा संगम घडविणारा आनंदी दीपावली महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा कार्यक्रम भगवान श्रीकृष्ण आश्रम,केज यांच्या वतीने भागवत भूषण ह.भ.प.श्री.केशव महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून शुक्रवार,दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता.याउपक्रमाचा उद्देश दिव्यांग बांधवांना दीपावली सणानिमित्त आनंदाचा वाटा देणे हा होता.कार्यक्रमाच्या निमित्ताने दिव्यांग व्यक्तीं ना जीवनावश्यक वस्तूंचे संच तसेच फराळाचे वाटप करण्यात आले. समाजातील वंचित घटकां प्रती आपुलकीचा हा भावनिक व सेवाभावी उपक्रम ठरला.यावेळी भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज




शास्त्री यांचे प्रवचन झाले.

**आध्यात्मिक प्रवचनाने प्रसन्न वातावरण**

यानंतर महान तपस्वी, परम त्यागी स्वामी भारतानंद गिरी महाराज यांनी केलेल्या प्रवचनाने सभागृहात आध्यात्मिक प्रसन्नतेचे वातावरण निर्माण झाले.त्यांच्या ओजस्वी वाणीने उपस्थित भक्त मंत्रमुग्ध झाले. यावेळी आशिर्वाद देताना त्यांनी सांगितले की,गोर गरीब जनता व दिव्यांग यांना आपल्या घासातला घास दिला पाहिजे.मनो रुग्णांना देखील स्वच्छ करुन गोडधोड पदार्थ खायला द्यावेत.श्रीकृष्ण महाराज सारुक हे गेल्या तेरा वर्षांपासून हा उपक्रम घेत असुन मी दरवर्षी येत आहे.

**सेवाभावी उपक्रमाने उजळली दीपावली**

दुपारी २ वाजता अपंग व्यक्तींना जीवनावश्यक साहित्य संचाचे वाटप करण्यात आले.त्यानंतर सर्व उपस्थितांसाठी स्नेह भोजन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे आयोजन भागवत भुषण ह.भ.प.केशव महाराज शास्त्री व भगवान श्रीकृष्ण आश्रम भक्त परिवार यांच्या वतीने करण्यात आले.समाजा तील विविध स्तरांतील मान्यवर,नागरिक,भाविक तसेच लाभार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सेवाभावी उपक्रमाला यशस्वी केले.

हा उपक्रम केवळ दीपावली सणापुरता मर्यादित न राहता समाजसेवेचे प्रेरणादायी उदाहरण ठरला असून, आयोजकांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## फुटबॉलच्या नवोदित खेळाडूंसाठी 'सुवर्णसंधी': राज्य शासनाच्या 'महादेवा' योजनेअंतर्गत नंदुरबारमध्ये १३ वर्षाखालील मुला-मुलींसाठी निवड चाचणी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

ग्रामीण भागातील उदयोन्मुख फुटबॉल खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखवण्याची एक मोठी संधी राज्य शासनाच्या 'महादेवा' योजनेअंतर्गत नंदुरबार जिल्ह्यात उपलब्ध झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (विफा) यांच्या संयुक्त विद्यमाने, दिनांक ३० आणि ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी १३ वर्षाखालील मुले आणि मुलींसाठी फुटबॉल निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटना, नंदुरबार यांच्या सहकार्याने ही निवड चाचणी जिल्हा क्रीडा संकुल, खामगाव रोड, नंदुरबार येथे होणार आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, या निवड चाचणीचा मुख्य उद्देश फुटबॉलच्या माध्यमातून ग्रामीण भागातील खेळाडूंना व्यासपीठ मिळवून देणे, त्यांची प्रतिभा उजेडात आणणे आणि त्यांच्या खेळाला राज्य व राष्ट्रीय स्तराकडे दिशा देणे हा आहे.



सुनंदा पाटील यांनी जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना आवाहन केले आहे की, या चाचणीमुळे जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंना राज्य पातळीवर आपले नाव गाजवण्याची संधी मिळेल. त्यामुळे इच्छुकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या क्रीडा स्वप्नांना दिशा द्यावी.

या महत्त्वपूर्ण योजनेमुळे नंदुरबार जिल्ह्यातील अनेक फुटबॉलपटूंचे क्रीडा स्वप्न पूर्ण होण्यास मदत मिळणार आहे.

# येडेश्वरी परिवाराच्या दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमाला अलोट गर्दी

## येडेश्वरी कारखान्यावर जिल्हाभरातील नागरिक आले एकत्र

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१आनंदगाव सा. ता.केज येथे येडेश्वरी परिवाराच्या वतीने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर स्नेहमिलन व फराळाचा सोहळा उत्साहात पार पडला.यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी सर्वांचे स्वागत करून जिल्हा भरातून एकत्र आलेल्या नागरिकांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

खा.बजरंग सोनवणेयांच्या वतीने येडेश्वरी साखर कारखाना,आनंदगाव येथे दिवाळीच्या पार्श्वभुमीवर स्नेहमिलन व फराळाचा कार्यक्रम आयोजीत केला होता.या आनंदसोहळ्यात बीड जिल्ह्यातील मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.आपुलकी,आनंद, एकताआणि सहभावनेचा हा सोहळा येडेश्वरी परिवाराच्या स्नेहबंधनाला आणखी बळकट करणारा ठरला.कार्यक्रमा दरम्यान परस्पर संवाद,शुभेच्छा विनिमय आणि सहकाऱ्यांच्या मैत्रीपूर्ण गप्पांमुळे वातावरण स्नेह पूर्ण आणि



उत्साही बनले. या प्रसंगी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविणाऱ्या सर्वांचे आभार खा.सोनवणे यांनी मानले.यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित ऊस उत्पादकांशी संवाद साधत नवीन पध्दतीने शेती करण्यासाठी सज्ज व्हा,एआय तंत्रज्ञात विकसीत होत आहे. यानूसार आता शेती करावी लागेल.तेव्हा, आपल्याला शेतीतून अधिक उत्पन्न घेणे शक्य होईल.नव्या बदलासाठी सर्वांनी पुढे येणेआवश्यक आहे.उत्पादन वाढविण्या साठी लागेल ती करायची तयारी ठेवा,कष्ट,मेहनती सोबत योग्य नियोजन देखील आवश्यक आहे. यासाठी कारखान्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन देखील करण्यात येईल, असेही यावेळी खा.सोनवणे म्हणाले. यावेळी बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींची उपस्थिती होती.

# ज्ञानदालनातून सामाजिक क्रांतीची नवी पहाट: वाघाळे येथे 'जननायक वीर बिरसा मुंडा वाचनालय'चे लोकार्पण

## नंदुरबार जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांच्या हस्ते वाचनालयाचे उद्घाटन; ग्रामीण युवकांना मिळणार प्रगतीची नवी दिशा

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

शिक्षण, वाचनसंस्कृती आणि सामाजिक परिवर्तनाच्या युगाला आरंभ करण्यासाठी नंदुरबार जिल्ह्यातील वाघाळे ग्रामपंचायतीने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. 'जननायक वीर बिरसा मुंडा वाचनालय' यालोकशिक्षण केंद्राचे लोकार्पण दि. २४ ऑक्टोबर २०२५, रोजी उत्साहात संपन्न झाले. या सोहळ्याला जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रारंभी, ग्रामपंचायतीच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांचे पारंपरिक स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच व उपसरपंच यांनी गावातील वाचन संस्कृती वाढवण्याच्या प्रयत्नांची माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी म्हणाल्या, वाचनालय हे गावाच्या प्रगतीचे केंद्र असते. शिक्षण हे परिवर्तनाचे सर्वात मोठे साधन आहे. ग्रामीण भागात वाचन संस्कृती



जोपासल्यास, आपल्या युवकांना निश्चितच नवी आणि उज्ज्वल दिशा मिळेल. त्यांनी तरुणांना नियमित वाचनाची सवय लावून या वाचनालयाचा उपयोग समाजविकासासाठी करण्याचे कळकळीचे आवाहन केले. या प्रेरणादायी सोहळ्यात तहसीलदार प्रदीप पवार, गटविकास अधिकारी बिराडे, तालुका कृषी अधिकारी राजपूत यांच्यासह स्थानिक जनप्रतिनिधी, ग्रामपंचायत सदस्य, महिला मंडळ आणि तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. याप्रसंगी, गावातील विद्यार्थी, महिला वर्ग आणि ज्येष्ठ नागरिकांनी 'जननायक वीर बिरसा मुंडा' यांच्या तेजस्वी जीवनावर आधारित पुस्तके व विचारसरणीचा अभ्यास करण्याचा संकल्प केला. वाचनालयामध्ये शैक्षणिक, प्रेरणादायी आणि स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त पुस्तकांचा संग्रह उपलब्ध करण्यात आला आहे, तसेच लवकरच डिजिटल लायब्ररी प्रणाली सुरू करण्याचे नियोजन आहे. ग्रामविकास अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर ग्रामपंचायत सदस्यांनी आभारप्रदर्शन केले. हा लोकार्पण सोहळा केवळ एक उद्घाटन नसून, तो ग्रामविकास, शिक्षण आणि जनजागृती या तिन्ही क्षेत्रांना जोडणारा एक प्रेरणास्रोत ठरला आहे. वाघाळे ग्रामपंचायतने लोकशिक्षणाच्या दिशेने उचललेले हे पाऊल, संपूर्ण नंदुरबार जिल्ह्यासाठी एक आदर्श ठरले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077